**पाहिजेत**
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/ वायरमन, 12 वी पास फ्रेश/ अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

**व्यवसाय**
आपण ज्येष्ठ, सेवानिवृत्त, गृहिणी आहात का ?
आपला वेळ, शिक्षण यांचा उपयोग करून नामाकित कंपनीत आपल्याला वेळेत कामाची सुवर्णसंधी!
निश्चित उत्पन्न ■ कोणतीही गुंतवणूक नाही
संपर्क : 8087459854

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २५९ वा | मंगळवार, दि. २६ मे २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# 'अच्छे दिन'च्या नावाखाली देशभरातील झुरळांची जिरवण्याचं काम सुरू

## पेट्रोल-डिझेल दरवाढ, तुटवड्याने शेतकरी अडचणीत- रोहित पवार

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** देशभरात वाढत्या इंधन दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि वाहतूक क्षेत्र आर्थिक संकटात सापडले असताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. पेट्रोल-डिझेलच्या सातत्याने वाढणाऱ्या किमती, ग्रामीण भागातील डिझेल तुटवडा आणि शेतकऱ्यांच्या अडचणी यावरून त्यांनी सरकारच्या धोरणांवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

सोशल मीडियावरून सरकारवर निशाणा साधताना रोहित पवार म्हणाले की, देशात पेट्रोल-डिझेलचे दर मेलोडी चॉकलेटप्रमाणे दर तीन-चार दिवसांनी लिटरमागे एक-एक रुपयांनी वाढत आहेत. इंधन दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांचे कंबरडे मोडले असून, महागाईचा भडका उडाला आहे. आगामी काळात पेट्रोल आणि डिझेल थेट ५० रुपयांनी महागले तरी आश्चर्य वाटणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

'अच्छे दिन'च्या घोषणेवरून टीका करताना त्यांनी सरकारच्या निर्णयांवर उपरोधिक भाषेत हल्ला चढवला. सुरुवातीला टाळ्या आणि थाळ्या वाजवण्याचे प्रयोग झाले, आता मात्र परदेशात फिरू नका, पेट्रोल-डिझेल वाचवा, सोनं खरेदी करू नका, तेल खाऊ नका, अशा प्रकारचे संदेश देणारे हे स्वातंत्र्यानंतरचे पहिले 'दैदिप्यमान' सरकार ठरल्याची खोचक टीका त्यांनी केली.

देशातील वाढत्या इंधन संकटामुळे पेट्रोलपंपांवर लांबच लांब रांगा लागत असल्याचा उल्लेख करत त्यांनी म्हटले की, पुढील काळात ५० रुपये वाढ झाली तरी लोकांना कुणी एक लिटर पेट्रोल गिफ्ट देणार नाही. उलट अनेक तास रांगेत उभे राहूनही इंधन मिळेलच याची खात्री उरलेली नाही. त्यामुळे सामान्य नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले.



रोहित पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये सरकारवर अधिक आक्रमक शब्दांत टीका करताना म्हटले की, 'अच्छे दिन'च्या नावाखाली सत्तेत आलेल्या सरकारने देशभरातील झुरळांची जिरवण्याचं काम सुरू केलं आहे. मात्र आता ही त्रस्त झुरळं संघटित होत असून, हीच सरकारसाठी धोक्याची घंटा ठरू शकते, असा इशाराही त्यांनी दिला.

दरम्यान, राज्यातील ग्रामीण भागात विशेषतः मराठवाडा, विदर्भ आणि खान्देश विभागात डिझेलचा मोठा तुटवडा निर्माण झाल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. खरीप हंगामाच्या तोंडावर मशागतीची कामे सुरू असताना शेतकऱ्यांना डिझेलसाठी १० ते १५ तास रांगेत उभे राहावे लागत असल्याचे त्यांनी सांगितले. अनेक ठिकाणी आगाऊ रक्कम भरूनही डिझेल मिळत नसल्याने शेतकरी आणि पेट्रोलपंप चालक दोघेही अडचणीत आल्याचे त्यांनी नमूद केले.

विशेष म्हणजे, सर्वाधिक तक्रारी मराठवाडा, विदर्भ आणि खान्देशातून येत असल्याचे सांगत त्यांनी सरकारवर गंभीर सवाल उपस्थित केला. या भागातील नागरिकांना जाणीवपूर्वक वंचित ठेवले जात आहे का? असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी पुरवठा साखळीतील बिघाडाकडे लक्ष वेधले.

शेतकऱ्यांना साठेबाजी करायची नाही, तसेच तासन्तास रांगेत उभे राहण्यासाठी त्यांच्याकडे वेळही नसतो. त्यामुळे केवळ पेट्रोलपंप चालकांना निर्देश देऊन समस्या सुटणार नाही. सरकारने केंद्राशी समन्वय साधून वेळेत आणि पुरेशा प्रमाणात इंधन पुरवठा सुनिश्चित करावा, अशी मागणीही रोहित पवार यांनी केली.

राज्यात आधीच वाढती महागाई, बेरोजगारी, दुष्काळ आणि पाणीटंचाईच्या समस्यांमुळे ग्रामीण भाग त्रस्त असताना आता इंधन तुटवड्याने शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे. खरीप हंगामाच्या तयारीवर याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, सरकारने तातडीने उपाययोजना न केल्यास आगामी काळात जनतेच्या संतापाचा मोठा उद्रेक होऊ शकतो, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

# सोलापूर जिल्हाधिकारी कातीर्केयन यांच्या नावाने बनावट सोशल मीडिया खाते

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी कातीर्केयन एस. यांच्या नावाने व्हिएतनाम व थायलंड या देशातून नाव, पदनाम व छायाचित्र वापरून बनावट सोशल मीडिया खाते तयार करून नागरिकांची दिशाभूल करण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या खात्यामार्फत काही व्यक्तींना पैशांची मागणी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले असून प्रशासनाने याची गंभीर दखल घेतली आहे. व जिल्हाधिकारी यांनी स्वतः सायबर



सेल येथे या अनुषंगाने तक्रार दाखल केली असून पोलीस विभागाच्या सायबर सेल मार्फत गुन्ह्याची तपासणी सुरू झालेली आहे.

जिल्हाधारी कातीर्केयन यांनी स्पष्ट केले आहे की, आपल्याकडून तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अशा प्रकारे कोणत्याही नागरिकांकडून आर्थिक व्यवहार किंवा मागणी केली जात नाही. बनावट खाते व त्यावरील संदेशांमुळे नागरिकांची फसवणूक होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी अशा संदेशांना बळी पडू नये, तसेच कोणत्याही संशयास्पद संदेशांची त्वरित माहिती प्रशासनाला द्यावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

सदर बनावट खात्यात जिल्हाधिकाऱ्यांचे नाव, पदनाम व छायाचित्र वापरून विश्वासार्हता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. एका व्हॉट्सॲप प्रोफाईलवर "Collector & District Magistrate" अशी नोंद करून नागरिकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून अशा प्रकारच्या फसवणुकीविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट केले आहे.

# जिल्ह्यातील पाच वर्षाखालील एकही बालक पोलिओ लसीकरणापासून वंचित राहू नये- निऱ्हाळी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेच्या कालावधीत ० ते ५ वयोगटातील एकही बालक पोलिओ लसीकरणापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. कोल्ड चेन, वाहनांची सोय, जनजागृती प्रचार व प्रसिद्धी तसेच लोकांचा सहभाग यावर भर देऊन मोहिम यशस्वी करावी, असे आवाहन अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात राष्ट्रीय प्लस पोलिओ लसीकरण मोहीम जिल्हा समन्वय समितीची बैठक अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली, त्याप्रसंगी ते मार्गदर्शन करत होते.

जिल्ह्याच्या शहरी व गमीण भागातील प्रत्येक पाच वषार्खालील बालकापर्यंत आरोग्य यंत्रणेने पोहोचून त्या बालकांचे लसीकरण करावे. यासाठी शहर व ग्रामस्तरावर शालेय विद्यार्थ्यांच्या प्रभातफेरीद्वारे जनजागृती करावी. आरोग्य यंत्रणे पुरेसे मनुष्बळाचे नियोजन करून ही मोहीम यशस्वी करावी त्यासाठी प्रत्येक वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांनी परस्परात योग्य समन्वय ठेवावा अशा सूचना निऱ्हाळी यांनी दिल्या.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड यांनी माहिती दिली की, दि. २८ जून २०२६ रोजी रविवारी सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम राबविण्यात येणार असून त्यासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज आहे. जिल्ह्यातील ५ वर्षाखालील ४,३६,५७२ बालकांना लस पाजण्यासाठी ग्रामीण भागात ५५७०, शहरी भागात ५७० व महानगरपालिका क्षेत्रात ३७३



लसीकरण बूथची सोय करण्यात आली आहे. मोहिमेसाठी ७२२२ कर्मचारी नियुक्त असून पर्यवेक्षणासाठी वैद्यकीय अधिकारी व आरोग्य अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे.

अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे यांनी सांगितले की, बसस्थानक, रेल्वे स्टेशन, बाजारपेठ, विटभट्टी, साखर कारखाने, यात्रा व लग्न समारंभ अशा गर्दीच्या ठिकाणी पोलिओ डोस पाजण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. भटक्या वसाहती व उसतोड कामगारांच्या वसाहतीतील बालकांसाठी मोबाईल टीमची सोय करण्यात आली आहे.

या बैठकीस जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, अति. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. मंजिरी कुलकर्णी, उपशिक्षणाधिकारी प्रकाश नांगरे, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी धनंजय वाळा, जिल्हा सांख्यिकी अधिकारी हेमंत पवार, परिचारिका सपना सोनवणे व साधना शिरसाट, वैद्यकीय महाविद्यालयातील निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. ओमकार येमुल, सहाय्यक प्राध्यापक डॉ. तिरुपती चोरमले तसेच आरोग्य विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# दूषित पाण्यामुळे सिद्धेश्वर तलावातील माशांचा मृत्यू



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सिद्धेश्वर तलावात पुन्हा एकदा माशांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. तलावाच्या पाण्यात वाढते प्रदूषण, सांडपाण्याचा मिसळणारा प्रवाह आणि ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे हजारो माशांचा मृत्यू झाला आहे. माशांचा मृत्यू होण्याची ही तिसरी घटना आहे.

सिद्धेश्वर तलावाच्या काठावर रविवारी (दि. 24) रोजी मोठ्या प्रमाणात मासे आले होते. त्यातील काही मासे मृत झाले होते, तर काही ऑक्सिजनअभावी तडफडत होते. मरणाऱ्या माशांचे प्रमाण जास्त असल्याने परिसरात दुर्गंधी पसरली आहे. तलावातील दूषित पाण्यामुळे जलचरांचे अस्तित्व धोक्यात आले असून, पर्यावरणीय संतुलन बिघडत असल्याची चिंता व्यक्त होत आहे.

शहरातील सांडपाणी आणि कचरा थेट तलावात जात असल्याने पाणी दूषित होत असल्याचा दावा पर्यावरण प्रेमींतून व्यक्त केला जात आहे. मात्र, याकडे महापालिका प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असून, नियमित स्वच्छता, जलशुद्धीकरण किंवा प्रदूषण नियंत्रणासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

# सोलापूर एसटी महामंडळाची कडक भूमिका; चालकांची आता नियमित अल्कोटेस्ट तपासणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) सोलापूर विभागाने कामावर हजर असताना मद्यपान करणाऱ्या चालकांवर आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना सुरू केल्या आहेत.

बसस्थानकातील आगारात ड्युटीवर येणाऱ्या सर्व चालकांची आता नियमितपणे अल्कोटेस्ट मशिनद्वारे तपासणी केली जात आहे.

चालक मद्यपान करून कामावर आल्यास त्याची तत्काळ ओळख पटवून संबंधितांवर कारवाई करता येणार असून, संभाव्य अपघात टाळण्यास यामुळे मदत होणार आहे. ऑनड्युटी मद्यपानामुळे उद्भवणारे धोके रोखण्यासाठी महामंडळाने नवे नियम लागू करत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे.

याच धर्तीवर सोलापूर



विभागातील नऊ आगारांमध्ये दररोज चालकांची अल्कोटेस्ट केली जात आहे. विविध मार्गावर धावणाऱ्या बस चालकांसोबतच वाहकांचीही मद्यपान तपासणी करण्यात येत आहे. संबंधित तपासणी नियमितपणे पार पडत आहे की नाही, यावर प्रशासनाकडून विशेष लक्ष ठेवण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

एसटी प्रशासनाच्या या निर्णयामुळे प्रवाशांच्या सुरक्षेत वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात असून, निष्काळजीपणाला आळा बसणार असल्याचे मत नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# शक्तिपीठ महामार्ग : तहसीलदार देणार बिगरशेतीची माहिती

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातून जाणाऱ्या शक्तिपीठ महामार्गाच्या बाधित गटात १ एप्रिल ते ५ मे या कालावधीत अकृषिक / विकसन / सनद परवानगी दिलेल्या प्रकरणांची माहिती तहसीलदार उद्या (सोमवार, ता. २५) देणार आहेत. या प्रकरणांची तपासणी करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्तिकयन एस. यांनी समिति नियुक्त केली आहे. ही समिती या प्रकरणांची पडताळणी करणार आहे. या पडताळणीचा अहवाल समितीच्या वतीने १५ दिवसांत जिल्हाधिकाऱ्यांना सादर केला जाणार आहे.

राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने २८ फेब्रुवारी २०२४ रोजी शक्तिपीठ महामागार्ची अधिसूचना प्रसिद्ध केली होती. या महामार्गामध्ये ५ मे २०२६ च्या अधिसूचनेनुसार बदल केला आहे. सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, माढा, पंढरपूर व माळशिरस या तालुक्यांतील गावांचा समावेश झाला. ही अधिसूचना ५ मे २०२६ रोजी प्रसिद्ध झाली असली, तरीही महामार्गात होत असलेल्या बदलाबाबत काही नागरिकांना आधीपासूनच कल्पना होती व त्या नागरिकांनी

घाईघाईने पुरेशी कागदपत्रे सादर न करता संबंधित सक्षम प्राधिकारी यांच्याकडून अकृषिक /विकसन / सनद परवानग्या मिळवल्याच्या तक्रारी जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारींच्या अनुषंगाने पडताळणी करण्यासाठी समिती नियुक्त करण्यात आली आहे.

**अशी आहे समिती...**

जिल्हा पुनर्वसन अधिकारी



सुशांत बनसोडे हे या समितीचे प्रमुख आहेत. या समितीत पुनर्वसनच्या तहसीलदार सरस्वती पाटील या सदस्य सचिव आहेत. सदस्य म्हणून नगर रचनाचे सहायक संचालक समीर शितोळे, जिल्हाधिकारी कार्यालयातील लेखाधिकारी नितीन पाटील, महसूलच्या नायब तहसीलदार स्मिता गायकवाड या समितीच्या सदस्य आहेत.

**चार तालुक्यांची तपासणी**

बार्शी, माढा, पंढरपूर व माळशिरस या तालुक्यांमध्ये १ एप्रिल ते ५ मे या कालावधीत अकृषिक / विकसन / सनद परवानगी दिलेली प्रकरणे, तात्पुरती परवानगी दिलेली प्रकरणे, अपुऱ्या कागदपत्रांवर परवानगी दिलेली प्रकरणे, उपविभागीय अधिकारी /तहसीलदार यांच्याकडे पाठवलेली प्रकरणे व प्रलंबित प्रकरणांची सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून व सर्व कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून दिल्या गेलेल्या आहेत किंवा कसे? याबाबत

"आमच्याकडे आलेल्या तक्रारींवरून ही समिती नियुक्त केली आहे. या समितीने कामकाजाला सुरवात केली आहे. याशिवाय बाधित गटात अलीकडच्या काळात लावलेली झाडे, बांधलेली घरे व शेतीमध्ये झालेले बदल याचीही माहिती आम्ही प्रांताधिकाऱ्यांकडून घेत आहोत."

**-कार्तिकेयन एस.**
जिल्हाधिकारी, सोलापूर

# नीट गैरप्रकारात पुण्यातील 5 प्राध्यापक CBI च्या रडारवर; कोचिंग सम्राटांचे कनेक्शन उघड

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** डॉक्टर होण्याचे स्वप्न उराशी बाळगून लातूर आणि पुण्यासारख्या शहरात येणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांसाठी एक धक्कादायक वास्तव समोर आले आहे. राज्यातील ज्या प्रसिद्ध कोचिंग संस्थांवर विश्वास ठेवून पालक आपली जमीन गहाण ठेवतात किंवा कर्ज काढतात, त्याच यंत्रणेतील काही घटक आता संशयाच्या भोवऱ्यात आहेत.

नीट (NEET-UG) परीक्षेतील गैरप्रकारांचा तपास आता केवळ पेपर फुटीपुरता मर्यादित न राहता, त्याने राज्यातील संपूर्ण कोचिंग अर्थव्यवस्थेचे धाबे दणाणले आहेत.


**कोचिंग सम्राट आणि प्रशासकीय साखळीचा पर्दाफाश**

या प्रकरणाला कलाटणी मिळाली ती लातूरमधील सुप्रसिद्ध 'आरसीसी' (RCC) क्लासेसचे मालक शिवराज मोटेगावकर यांच्या अटकेनंतर. तपासाची व्याप्ती वाढल्यानंतर आता मनिषा मांढरे, मनिषा वाघमारे आणि पुण्यातील प्राचार्य मनिषा हवालदार यांची नावेही समोर आली आहेत.

मनिषा हवालदार या नीटच्या भौतिकशास्त्र (Physics) विषयाच्या भाषांतर प्रक्रियेशी अधिकृतपणे जोडल्या गेल्या होत्या. असा आरोप आहे की, स्मृतीवर आधारित प्रश्न तयार करून ते व्हॉट्सॲप आणि प्रिंटआउट्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यात आले. सीबीआय आता फॉरेन्सिक टूल्सच्या मदतीने डिलीट केलेले चॅट्स रिकव्हर करत असून या मोठ्या नेटवर्कचा शोध घेत आहे.

**पुण्यातील प्रसिद्ध कॉलेजचे प्राध्यापक रडारवर**

तपासाचे धागेदोरे आता वैयक्तिक आरोपींकडून संस्थांकडे वळले आहेत. पुण्यातील एका अत्यंत प्रसिद्ध



महाविद्यालयातील 5 प्राध्यापक सध्या सीबीआयच्या रडारवर आहेत. हे प्राध्यापक गेल्या अनेक वर्षांपासून आरोपींच्या संपर्कात असल्याचे बोलले जात आहे आणि त्यातील काही जण तर एनटीए (NTA) च्या समित्यांवरही कार्यरत होते. कोचिंग संस्था, परीक्षेतील मध्यस्थ आणि संस्थात्मक संपर्क यांनी मिळून एक समांतर यंत्रणा उभी केली होती का, याचा तपास आता अत्यंत गांभीर्याने केला जात आहे.

**लातूर पॅटर्न आणि बदललेले स्वरूप**

एकेकाळी शिस्तप्रिय शिक्षणासाठी ओळखला जाणारा 'लातूर पॅटर्न' आता वेगळ्याच कारणाने चर्चेत आला आहे. एकेकाळी शैक्षणिक क्रांती मानल्या गेलेल्या या मॉडेलचे रूपांतर आता अशा संस्कृतीत झाले आहे, जिथे मार्कांनाच चलन मानले जाऊ लागले आहे. या स्पर्धेच्या युगात एका शेतकरी कन्येने नीट पेपर फुटीच्या बातम्यांमुळे हताश होऊन आत्महत्या केल्याची मन हेलावून टाकणारी घटनाही समोर आली आहे. या गोंधळामुळे केवळ वैद्यकीयच नाही, तर अभियांत्रिकी आणि फार्मसी प्रवेशाचे वेळापत्रकही कोलमडले असून विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड अस्वस्थता पसरली आहे.

**पैशांचा महापूर आणि डिजिटल फसवणूक**

तपासात असे समोर आले आहे की, टेलिग्राम (Telegram) सारख्या माध्यमांवरून '100 टक्के यश' आणि 'लीक पेपर' देण्याचे आश्वासन देऊन पालकांकडून लाखो रुपये उकळले जात होते. या व्यवहारांची व्याप्ती इतकी मोठी आहे की आता अंमलबजावणी संचालनालयाने (ED) देखील यात प्रवेश केला आहे. आरोपींच्या मालमत्ता, कोचिंग व्यवसायातील गुंतवणूक आणि रोख व्यवहारांची तपासणी केली जात आहे. शिवराज मोटेगावकर यांच्या पुणे आणि लातूरमधील रिअल इस्टेट गुंतवणुकीचीही आता चौकशी सुरू झाली आहे.

**सर्वोच्च न्यायालयाची भूमिका आणि सुधारणांची मागणी**

नीट परीक्षेतील या सावळागोंधळावर सर्वोच्च न्यायालयानेही चिंता व्यक्त केली आहे. मागील प्रकरणांमधून यंत्रणेने काही धडा घेतला आहे का, असा सवाल न्यायालयाने उपस्थित केला आहे. आता केवळ कारवाई करून थांबता येणार नाही, तर एनटीए (NTA) ची पुनर्रचना करणे, डिजिटल सुरक्षा वाढवणे आणि परीक्षा पद्धतीत मूलभूत सुधारणा करणे ही काळाची गरज बनली आहे. महाराष्ट्राची कोचिंग संस्कृती जी एकेकाळी यशाचे प्रतीक होती, ती आता या तपासामुळे मोठ्या संकटात सापडली आहे.

## संपादकीय

# मंत्रिमंडळाचा विस्तार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार दोन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करण्याच्या मार्गावर आहे. मात्र, आतापर्यंत मंत्रिमंडळाचा एकही विस्तार झाला नाही. टीडीपीचे चंद्राबाबू नायडू, जेडीयूचे नितीशकुमार, शिवसेनेचे एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादीच्या सुनेत्रा पवार यांच्यासह भाजपातील संभावित लाभार्थी मंत्रिमंडळाच्या विस्ताराची चातक पक्ष्याप्रमाणे वाट पाहत आहेत!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युरोपच्या दौऱ्याहून परत येताच 'सेवातीर्थ' या आपल्या निवासस्थानी मंत्रिपरिषदेची बैठक बोलाविली. त्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाच्या विस्ताराची चर्चा पुन्हा एकदा ऐरणीवर आली. या बैठकीला कॅबिनेट मंत्री, स्वतंत्र प्रभाराचे राज्यमंत्री आणि राज्यमंत्री उपस्थित होते.

इराण आणि इस्रायल युद्धामुळे पश्चिम आशियात जी परिस्थिती निर्माण झाली त्या तणावाच्या पार्श्वभूमीवर तेलाच्या किमती, इंधन पुरवठा साखळी आणि महागाईशी संबंधित विषयावर चर्चा झाली. मंत्रिमंडळाची ही बैठक 11 महिन्यांनंतर बोलाविण्यात आली होती आणि जवळपास 4-5 तास ही बैठक चालली. नरेंद्र मोदी यांच्या सरकारला 10 जून रोजी दोन वर्षे पूर्ण होणार आहेत.

आता मोदी सरकारचा चेहरा-मोहरा बदलण्याची तयारी सुरू झाली आहे. या बैठकीत कॅबिनेट सचिव राजीव गौबा आणि निती आयोगाचे उपाध्यक्ष अशोक लाहिरी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व मंत्री आणि त्यांच्या मंत्रालयांच्या कामकाजाचा अहवाल पीपीटीद्वारे पंतप्रधानांना सादर करण्यात आला.

यात मंत्र्यांना त्यांच्या कामगिरीच्या आधारावर गुण देण्यात आले. सर्वात प्रभावी मानल्या गेलेल्या मंत्रालयांना 'ए-प्लस' मानांकन देण्यात आले. हे मानांकन केवळ पाच सहा मंत्र्यांनाच मिळाले अशी माहिती आहे. यात केंद्रीय रस्ते, परिवहन आणि राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी, आरोग्य मंत्री जेपी नड्डा, मनोहरलाल खट्टर यांचे ऊर्जा मंत्रालय, प्रल्हाद जोशी यांचे ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालय आणि किशन रेड्डी यांचे कोळसा मंत्रालयाचा समावेश आहे.

ज्या मंत्रालयांमध्ये फेरबदल करण्याची गरज व्यक्त करण्यात आली त्यात कामगार, शिक्षण आणि कौशल्य विकास मंत्रालयांचा समावेश आहे. पंतप्रधानांनी या बैठकीत मंत्र्यांना अनावश्यक खर्च कमी करण्यास आणि परदेश दौरे व शिखर परिषदा तात्काळ थांबवण्यास सांगण्यात आले आहे. मंत्र्यांनी महिन्यातून पाच दिवस देशाच्या विविध भागांत आपापल्या मंत्रालयांचे कार्यक्रम आयोजित करावेत आणि जनतेशी थेट संवाद साधण्याचा प्रयत्न करावा, असे सुचविण्यात आले. प्रत्येक मंत्र्यांनी आपल्या कर्तव्याबाबत अधिक दक्ष राहिले पाहिजे.

शिवाय, ज्या ठिकाणी मंत्रालय स्वतःचे कार्यक्रम आयोजित करू शकत नाही त्या ठिकाणी पक्ष संघटनेची मदत घेऊन कार्यक्रमाचे आयोजन करावे असेही सांगण्यात आले. सरकारच्या रिपोर्ट कार्ड प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल प्लॅटफॉर्म, डेटा शेअरिंग, डेटा-आधारित निर्णय प्रक्रिया आणि मंत्रालयांमधील सहकार्य यांसारख्या इतर क्षेत्रांनीही भूमिका बजावली. सरकारने फाइल्स प्रलंबित राहणार नाहीत आणि तक्रारींचे निराकरण लवकरात लवकर होईल याची खात्री करून घेण्याचा सल्लाही मंत्र्यांना देण्यात आला.

पंतप्रधान मोदींनी मंत्रालयांना विकासकामांना गती देण्याचे आणि प्रक्रिया सुलभ करण्याचे निर्देश दिले. त्यांनी विकासकामांमधील अडथळे ओळखून त्यावर उपाय शोधण्याचे आवाहन केले. कामात कोणते अडथळे येत आहेत, निर्णय प्रक्रियेला, त्यांच्या अंमलबजावणीला आणि लाभांच्या वितरणाला कोणते अडथळे विलंब करत आहेत आणि या समस्यांचे निराकरण करण्यासाठी कोणत्या सुधारणा करता येतील, हे स्पष्ट करण्यास मंत्रालयांना सांगण्यात आले आहे.

याशिवाय, पर्यायी ऊर्जा स्रोतांवर काम करणे आणि बायोगॅसच्या वापरावरही भर दिला. केंद्रीय मंत्रिमंडळ परिषदेत प्रलंबित न्यायालयीन खटल्यांच्या मुद्द्यावरही चर्चा झाली. या बैठकीनंतर सर्वात महत्त्वाचा निर्माण झालेला प्रश्न म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळाच्या पहिल्या विस्ताराला मुहूर्त कधी साधणार? राज्यसभेच्या 24 जागांसाठी 18 जून रोजी मतदान होणार आहे.

याशिवाय, संसदेचे पावसाळी अधिवेशन जुलैच्या अखेरीस सुरू होण्याची शक्यता आहे. यामुळे अधिवेशनापूर्वी किंवा अधिवेशनानंतर मंत्रिमंडळाचा विस्तार होऊ शकतो.

पंतप्रधान मोदी यांनी संकटावर लक्ष ठेवण्यासाठी आणि भारताला पुढील अडचणींपासून वाचवण्यासाठी उपाययोजना सुचवण्यासाठी सरकारने संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या नेतृत्वाखाली मंत्र्यांचा एक उच्चस्तरीय अनौपचारिक गट आधीच स्थापन केला आहे. केंद्रीय मंत्री अमित शाह, निर्मला सीतारामन आणि हरदीप सिंग पुरी यांचा या गटात समावेश आहे. राजनाथ सिंह यांनी अलीकडेच सांगितले की, सरकार अहोरात्र परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. राजनाथ सिंह यांनी सांगितले की, कच्चे तेल असो, ऊर्जा असो किंवा एलपीजी असो, आपल्याकडे अजूनही पुरेसा साठा आहे.

पुढील वर्षी मार्चमध्ये उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडसह पाच राज्यांमध्ये, तर नोव्हेंबरमध्ये गुजरातमध्ये निवडणुका होणार आहेत. त्यामुळे मोदी या राज्यांमधील राजकीय परिस्थितीचा आढावा घेऊन आपले मंत्रिमंडळ निश्चित करतील, अशी जोरदार चर्चा आहे.

विरोधी पक्ष बऱ्याच काळापासून काही केंद्रीय मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहे, त्यामुळे मोदींसाठी त्यांना पदावरून दूर करण्याची ही एक अनोखी संधी असेल. शिवाय, 2014 मधील पहिल्या मोदी सरकारपासून अनेक ज्येष्ठ मंत्री सरकारमध्ये सामील आहेत. यांच्यातील बहुतांश मंत्र्यांनी वयाची सत्तरी पार केली आहे. या मंत्र्यांना आता पक्षाच्या कामाला लावले जाऊ शकते.

एनडीएमध्ये नवीन मित्रपक्षांना सामील करून घेण्यावरही भाजपचे लक्ष आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांना गळ घालण्याचा प्रयत्न सुरू आहे. ते राजी झाले तर त्यांची कन्या खासदार सुप्रिया सुळे यांना मंत्रिमंडळात सामावून घेतले जाऊ शकते. मात्र सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी पक्ष महाराष्ट्रात युती सरकारमध्ये आहे.

सुनील तटकरे हे अजित गटाचे एकमेव खासदार लोकसभेत आहेत. याउलट शरद पवार गटाचे खासदार जास्त आहे. यामुळे, शरद पवार गटाला मंत्रिमंडळात सामावून घेण्याचा प्रयत्न केला गेला तर मोदी सरकारला शरद पवार यांच्या अटी मान्य कराव्या लागतील. शिवाय, एक ज्येष्ठ नेते या नात्याने त्यांचा शब्द अमान्य करणे सरकारला सोपे जाणार नाही.

उबाठा सेनेचे उद्धव ठाकरे यांच्याशीही चर्चा सुरू आहे. तसेच झारखंड मुक्ती मोर्चा पक्षाच्या सतत संपर्कात आहे. हेमंत सोरेन यांची वृत्ती अशीच कायम राहिल्यास जेएमएमदेखील एक नवीन आघाडीचा भागीदार बनू शकते. भाजपचे रणनीतिकार डीएमकेच्याही सतत संपर्कात आहेत. बंगालमधील तृणमूल काँग्रेस आणि पंजाबमधील आम आदमी पार्टीमध्ये मोठी फूट पाडली जाऊ शकते.

जर सर्व काही भाजपच्या रणनीती आणि हेतूंनुसार घडले तर त्यांना दिल्लीत या पक्षांमधील व्यक्तींना मंत्री म्हणून नियुक्त करण्यास भाग पडू शकते. झारखंडमध्ये, भाजप गेल्या काही काळापासून हेमंत सोरेन यांच्याकडे मैत्रीचा हात पुढे करत आहे तर दुसरीकडे गुप्तपणे तेथील आपली पक्ष संघटना मजबूत करत आहे. अशात, रालोआतील घटक पक्षांची संख्या वाढली तर गेल्या 10-12 वर्षांपासून जे मंत्री बनून वावरत आहेत त्यांना पक्षाच्या कामाला जुंपण्याची पंतप्रधानांची तयारी असल्याची चर्चा आहे.

# पालकांच्या अपेक्षामुळेच मुलांच्या स्वप्नांचा चुराडा....

सर बोर्ड परीक्षेला ॲडजेस्ट करणार का? परीक्षेला उत्तर सांगणार का? मुलगा शाळेत येणार नाही ? हे मान्य असेल तरच तुमच्या इथं प्रवेश घेतो. हे एका सुज्ञ, सुशिक्षित पालकाने त्याच्या मुलाच्या प्रवेशासाठी आल्यावर प्रश्न विचारले. आम्हाला काय बोलावे हे समजेना कारण स्वतःच्या मुलासमोर पालकच असे विचारत असेल तर पालक स्वतःच मुलाच्या शिक्षणाचा खेळखंडोबा करतोय. स्वतः पालकच आपल्या मुलांना लुळीपांगळी करतात. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे आताचा ठएएळ परीक्षेचा पेपर फुटी. खरेतर त्याला जेवढे अकॅडमी वाले जबाबदार आहेत त्यांच्या दुप्पट पालक जबाबदार आहेत. लाखो रुपये देऊन आपल्या मुलाच्या भविष्याचा विचार न करता पेपर विकत घेतला. खरे गुणवंत बाजूला राहतात आणि पालकांमुळे फसवे, डुप्लिकेट समोर येतात. आता शासनाने परीक्षाच रद्द केली. परीक्षा झाली म्हणून गाफील असलेल्या मुलांना परत परीक्षा द्यायची? मुलांच्या मनावर किती ताण आला असेल? आता पालक यांचा विचार करणार का?

शिक्षण हे केवळ उदरनिर्वाहाचे साधन झाले आहे. तुम्ही कधी शांतपणे विचार केलाय, लातुर, कोटा, पुणे किवा शहरातल्या दहा बाय दहाच्या च्या कोंदट खोल्यांमध्ये महाराष्ट्राची लाखो तरुण बुद्धिमत्ता दरवर्षी कशी काय सडत असेल? डॉक्टर होण्याचं स्वप्न उराशी बाळगून तासंतास दोन तीन वर्षे अभ्यास करायचा आणि परीक्षा झाली की असे काहीतरी घटना घडल्यानंतर विद्यार्थ्यांनी काय करायचे? "नीट" सारखी परीक्षा ही फक्त एक प्रवेश परीक्षा नाही. तर ती लाखो मुलांच्या स्वप्नांची, त्यागाची आणि अनेक वर्षांच्या जिद्दीची, संघर्षाची ही कठोर परीक्षा. याला जबाबदार पालक आहेत. स्वतःच्या अपेक्षा मुलांवरती लादून, मोठमोठ्या फी भरून मुलांना शाळेत न पाठवता अकॅडमीला जॉईन करतात. अकॅडमी हा शिक्षणाचा नाही, तर तरुणांच्या हतबलतेवर आणि 'इमोशनल ब्लॅकमेल' वर चालणारा महाराष्ट्रातला सर्वात मोठा आणि क्रूर बिझनेस आहे.

गल्लोगल्ली उघडलेले हे NEET/JEE/CET/GAT/MPSC/UPSC क्लासवाले तुम्हाला डॉक्टर, इंजिनिअर, लाल दिव्याच्या गाडीच,, अधिकाराचे, आणि कलेक्टर होण्याचे स्वप्न अत्यंत हुशारीने विकतात. बिझनेस सायकॉलॉजीच्या भाषेत याला 'Selling the Hopium' खोट्या आशेचा व्यापार म्हणतात. ग्राऊंड लेव्हलचे भयानक वास्तव हे आहे की, या परीक्षांचा प्रॅक्टिकल 'सक्सेस रेट' अवघा ४ ते ५ टक्के आहे. म्हणजे ९५ टक्के मुले शेवटी रिकाम्या हातानेच घरी परतणार असतात, हे या अकॅडमी, क्लासवाल्यांना पहिल्या दिवसापासून पूर्णपणे माहीत असते. तरीही मुले अनेक वर्षे या दलदलीत का अडकतात? इथे सुरू होतो अत्यंत डार्क सायकॉलॉजिकल ट्रॅप. पहिली दोन वर्षे आणि बापाचे दोनतीन लाख रुपये उधळल्यावर, "आता अर्ध्यावरून मागे कसं जायचं? लोक काय म्हणतील?" या भीतीने तो तरुण तिथेच अडकून पडतो. तो तरुण स्वतःला 'स्पर्धक' समजत असतो, पण कॉर्पोरेट आणि इकॉनॉमिक्सच्या भाषेत तो या अकॅडमी, क्लासवाल्यांचा फक्त एक दरवर्षी फी भरणारे एटीएम बनलेला असतो. या सिस्टीमला तुम्ही पहिल्याच प्रयत्नात पास होऊन गेलेले कधीच नको असतात. तुम्ही जोपर्यंत नापास होत राहता आणि पुन्हा पुन्हा नव्याने फी भरत राहता, तोपर्यंतच यांच्या अकॅडमीच्या इमारतीचे मजले वाढत राहतात. यशाच्या आशेवर मुलांना अनेक वर्षे एका बंद खोलीत सडवतो, तो समाज, पालक आपल्या मुलाची प्रगती नाही, तर स्वतःचा आर्थिक आणि मुलांचा बौद्धिक खून करत असतो.

आज खरंच समजत नाही. विद्यार्थ्यांना नेमकं काय सांगायचं? मेहनत करा? प्रामाणिक राहा? स्वप्नांसाठी झुंजा ? स्वतःला एका खोलीत बंद करून घेतो. मोबाईल, मित्र, आनंद, सण, वाढदिवस सगळं विसरतो. स्वतःच्या, आई-बाबांच्या डोळ्यातलं स्वप्न पूर्ण करण्यासाठी स्वतःचं आयुष्य थांबवतो. तर दुसरीकडे कोणीतरी लाखो रुपये मोजून प्रश्नपत्रिका विकत घेतो ! पण शेवटी काय होतं? ज्याच्याकडे पैसा आहे, ओळखी आहेत, वशीला आहे, पळवाटा आहेत तो पुढे निघून जातो. पैशाने जर प्रश्नपत्रिका विकत मिळत असतील तर मग गरीब विद्यार्थ्यांनी पुस्तकं उघडायची तरी का ? अशा अनेक पेपरफुटीमुळे लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या विश्वासाची हत्या होत आहे. जेव्हा मुलांची स्वप्नं मरतात तेव्हा देशाचे भविष्यही मरतं. पालकांच्या अवास्तव अपेक्षा, पैशाच्या जोरावर यश मिळवण्याची प्रवृत्ती आणि शिक्षणाचे झालेले व्यापारीकरण यामुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांचा विश्वास तुटत आहे. शिक्षण हे केवळ करिअरचे नव्हे, तर मूल्यांचेही माध्यम असावे असे वाटते......

**प्रा. काटकर**
**तात्यासाहेब शिवाजी**
९२२६१४४८३६ अकलूज
(महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक असून शैक्षणिक व सामाजिक विषयावर लेखन करतात)

# राज्यस्तरीय ATS प्रज्ञाशोध परीक्षेत करमाळ्याच्या प्रबोधिनी कांबळेचे घवघवीत यश

**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** करमाळा शहराच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरणारी उल्लेखनीय कामगिरी येथील 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा न.प. करमाळा' या शाळेच्या विद्यार्थिनीने केली आहे. इयत्ता पहिलीमध्ये शिक्षण घेणारी कु. प्रबोधिनी सुमेध (दादा) कांबळे हिने राज्यस्तरीय ATS प्रज्ञाशोध परीक्षा २०२६ मध्ये उज्वल यश संपादन करत केंद्र, जिल्हा आणि राज्य गुणवत्ता यादीत मानाचे स्थान पटकावले आहे.

नुकत्याच जाहीर झालेल्या निकालानुसार, अत्यंत कमी वयात प्रबोधिनीने आपल्या बुद्धिमत्ता, अभ्यासू वृत्ती आणि जिद्दीच्या बळावर ही कठीण समजली जाणारी परीक्षा उत्कृष्ट गुणांनी उत्तीर्ण केली. तिने केंद्र स्तरावर ५ वा क्रमांक, सोलापूर जिल्ह्यात ८ वा क्रमांक, तर संपूर्ण महाराष्ट्र राज्यात ११ वा क्रमांक मिळवत करमाळ्याचे नाव राज्यभर उज्ज्वल केले आहे.



ATS प्रज्ञाशोध परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेची, तार्किक विचारशक्तीची आणि आकलनशक्तीची चाचणी घेणारी राज्यस्तरीय प्रतिष्ठेची परीक्षा मानली जाते. अशा परीक्षेत इयत्ता पहिलीच्या विद्यार्थिनीने मिळवलेले हे यश विशेष कौतुकास्पद मानले जात आहे.

प्रबोधिनीच्या या दैदीप्यमान यशामुळे 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा' तसेच करमाळा तालुक्याच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा राज्य पातळीवर छाप पडली आहे. तिच्या या यशाबद्दल पै. जितेश (बापू) कांबळे, नगरसेवक संदीप (भाऊ) कांबळे, चुलते विवेक कांबळे सर, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच करमाळा परिसरातील विविध मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

तिच्या यशामागे आई-वडिलांचे मार्गदर्शन, शिक्षकांचे परिश्रम आणि स्वतःची चिकाटी असल्याचे बोलले जात आहे. भविष्यातही प्रबोधिनीने अशाच प्रकारे यशाची परंपरा कायम ठेवून उच्च शैक्षणिक भरारी घ्यावी, अशा शुभेच्छा सर्व स्तरातून व्यक्त केल्या जात आहेत.

# नियमांचे पालन करून बकरी ईद साजरी करा - पोलीस आयुक्त

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागरिकांनी नियमांचे पालन करून सण साजरा करावा, कोणत्याही परिस्थितीत कायदा हातात घेऊ नये आणि अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांनी केले.



बकरी ईदच्या अनुषंगाने शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस आयुक्तालयात विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस पोलीस अधिकारी, शांतता समिती सदस्य, महानगरपालिका अधिकारी, शहर काजी, मुस्लिम धर्मगुरू, प्रमुख मस्जिदींचे विश्वस्त तसेच शहरातील प्रमुख ईदगाह मैदानांचे विश्वस्त उपस्थित होते. यावेळी पोलीस आयुक्त एम. राज कुमार बोलत होते.

बैठकीत सामाजिक सलोखा आणि शांतता अबाधित ठेवण्यावर भर देण्यात आला. सोशल मीडियावर कोणत्याही प्रकारचे आक्षेपार्ह संदेश, फोटो किंवा व्हिडिओ फॉरवर्ड न करता ते तातडीने हटवावेत, तसेच अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही करण्यात आले. बैठकीस उपस्थित शांतता समिती सदस्य आणि इतरांनी बकरी ईदच्या निमित्ताने येणाऱ्या विविध समस्या व सूचना मांडल्या.

बैठकीची प्रस्तावना करताना पोलीस उपायुक्त अश्विनी पाटील यांनी नागरिकांना महत्त्वाच्या सूचना दिल्या. बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर कोणीही गोवंशीय प्राण्यांची अवैध वाहतूक करू नये. अशा प्रकारची वाहतूक आढळल्यास पोलिसांशी किंवा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा. कोणत्याही खाजगी व्यक्तीने किंवा संघटनांच्या कार्यकर्त्यांनी स्वतःहून वाहने अडवू नयेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

कुर्बानीनंतर सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर किंवा उघड्यावर रक्त अथवा मांस पडणार नाही याची दक्षता घ्यावी. स्वच्छतेचे काटेकोर पालन करून दुर्गंधी आणि रोगराई पसरणार नाही, यासाठी विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळी राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य वसीम बुऱ्हाण, पोलीस उपायुक्त प्रितम पावलकर, सहायक पोलीस आयुक्त प्रताप पोमण, दिलीप पवार, सुधीर खिरडकर, राजन माने, नगर अभियंता सारिका आकुलवार, तपन डंके, महावितरणचे कार्यकारी अभियंता राजकुमार पाटील, अग्निशामक दलाचे अधिकारी समीर पाटील तसेच विविध पोलीस ठाण्यांचे वरिष्ठ अधिकारी आणि शहरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'करवीर हायकर्स' च्या सातजणांची तिरंगा फडकवून, संविधान उद्देशिका प्रदर्शनाने एवरेस्ट बेस कँप' यशस्वी

**रत्नागिरी (कटूसत्य वृत्त):-** कोल्हापूरच्या 'करवीर हायकर्स' च्या सातजणांनी अत्यंत प्रतिकूल हवामानातील आणि खडतर अशी समुद्र सपाटीपासून ५३६४ मीटर उंचीवर पोहचत 'एव्हरेस्ट बेस कँप' मोहीम शनिवारी यशस्वी केली. रत्नागिरीचे उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल गायकवाड, जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत सातपुते, त्यांच्या पत्नी डॉ सुप्रिया यांचा यात समावेश आहे.

वयाच्या २१ व्या वर्षी एव्हरेस्ट सर करणाऱ्या आणि जगातील मृत्यूचा पर्वत अशी ओळख असणाऱ्या 'अन्नपूर्णा' पर्वत सर करणाऱ्या जगातील सर्वात तरुण ठरलेल्या करवीर हायकर्सच्या कस्तुरी सावेकर यांच्या मार्गदर्शन आणि नेतृत्वाखाली ही मोहीम पार पडली.




'एव्हरेस्ट बेस कँप'साठी भगवान गौतम बुध्दांच्या जन्मभूमीत नेपाळ-काठमांडूत १५ मे रोजी उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल गायकवाड, जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत सातपुते, चिपळूण येथील बी के वालावलकर रुरल मेडीकल कॉलेजच्या सहप्राध्यापक डॉ. सुप्रिया सातपुते, मुरुम (धाराशिव) चे उद्योजक आप्पासाहेब मुंडासे, कोल्हापूरचे उद्योजक विशाल मेहता, समाज माध्यम प्रभावक पती पत्नी नुपूर आणि अक्षय मठकर दाखल झाले.

काठमांडू ते जगातील सर्वात धोकादायक ओळख असणाऱ्या लुकला विमानतळ येथून छोट्या विमानप्रवासानंतर प्रत्यक्षात 'इबीसी' कडे वाटचालीला सुरुवात झाली. लुकला ते फाकडींग ते नामचे बाजार ते तेंगबोचे ते दिंगबोचे ते लोबुचे ते गोरकक्षेप ते एव्हरेस्ट बेस कँप असा हा 'ट्रेक पूर्ण झाला.

शनिवार दि २३ मे रोजी राष्ट्रीय ध्वज फडकवून आणि संविधानाची उद्देशिका प्रदर्शित करुन या यशस्वी मोहिमेची सांगता झाली.

रात्री उणे १५ अंश सेल्सिअस तर दिवसा ४ ते ६ अंश सेल्सिअस तपमान, लोबूचे ते 'इबीसी' अतिशय जीवघेणा प्रवास ठरला. प्रतिकूल, खडतर वातावरण, दुर्गम रस्ता, हाडे गोठवणारे थंड वारे मानसिक आणि शारीरिक क्षमतेची कसोटी जागोजागी घेत होते. वाटेत येणाऱ्या अशा आव्हानांना शरीर आणि मन सक्षमपणाने सामोरे जावू शकते, हे या ट्रेकवरुन या पथकाने अनुभवले.

नेपाळमधील 'पीक १५ ॲडव्हेंचर' चे शेखर तमांग, योगेंद्र तमांग व प्रशांत तमांग यांनी या मोहिमेत मार्गदर्शक म्हणून भूमिका निभावली.

# 'जकराया'च्या थकीत ऊस बिलासाठी धरणे आंदोलन

**पोखरापूर (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील वटवट येथील जकराया शुगर या साखर कारखान्याने सन २०२५-२६ च्या गळीत हंगामात जाहीर केलेल्या ऊस दरापैकी केवळ ५० टक्के रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केल्याचा आरोप करण्यात आला आहे. उर्वरित थकीत रक्कम १५ टक्के व्याजासह तात्काळ जमा करावी, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य जनहित शेतकरी संघटनेच्या वतीने मोहोळ तहसील कार्यालयासमोर शुक्रवारपासून बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे.



या आंदोलनाचे नेतृत्व जनहित शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर देशमुख करत असून शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढा उभारण्यात आला आहे.

मोहोळ तालुक्यातील जकराया साखर कारखान्याने सन २०२५-२६ च्या गाळप हंगामात गाळप गेलेल्या उसासाठी प्रतिटन १५०० रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केले होते. मात्र, उर्वरित ५० टक्के थकीत रक्कम प्रतिटन ३ हजार रुपये १५ टक्के व्याजासह जमा करणे अपेक्षित असताना कारखाना प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष दिले नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठी आर्थिक अडचण निर्माण झाली असल्याचे सांगण्यात आले.

या संदर्भात प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून संबंधित कारखान्याला पत्रव्यवहाराद्वारे शेतकऱ्यांचे थकीत पैसे अदा करण्यास भाग पाडावे, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा आगामी काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा प्रभाकर देशमुख यांनी दिला.

यावेळी बिरू वाघमोडे, पिंटू पवार, दिगंबर कावळे, गणेश चवरे, बालाजी कदम, राजाभाऊ पवार, अभिमान गायकवाड, संभाजी माळी, सिद्राम वाघमोडे, नागेश बारबोले, शुभम तळेकर, पृथ्वीराज भोसले, उमेश माने, अनिल वसेकर यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# सोलापूर महानगरपालिकेचा 'नो व्हेईकल डे' उपक्रम उत्साहात सुरू

**सोलापूर,(कटूसत्य वृत्त):-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचत, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत जीवनशैलीचा अवलंब करण्याबाबत केलेल्या आवाहनाच्या अनुषंगाने सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने विविध पर्यावरणपूरक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. युद्धजन्य परिस्थितीमुळे पेट्रोल, डिझेल व इतर इंधनाचा काटकसरीने आणि गरजेपुरता वापर व्हावा, तसेच वाढते वायू प्रदूषण आणि जागतिक तापमानवाढ यावर



नियंत्रण मिळवण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

या उपक्रमाचा एक भाग म्हणून सोलापूर महानगरपालिकेतील सर्व पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी दर सोमवार हा दिवस 'नो व्हेईकल डे' म्हणून घोषित करण्यात आला आहे. या दिवशी खाजगी तसेच शासकीय वाहनांचा वापर टाळून सार्वजनिक वाहतूक, सायकल, ई-वाहने किंवा पायी कार्यालयात येण्यास प्राधान्य देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या उपक्रमाला प्रत्यक्ष कृतीतून पाठिंबा देत आज मा.अतिरिक्त आयुक्त्य श्रीमती. विना पवार मॅडम व आरोग्याधिकारी श्रीमती. राखी माने ह्या ई- रिक्षाने सोलापूर महानगरपालिकेत दाखल झाले. व सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने सर्व नागरिकांना या विधायक उपक्रमात सहभागी होऊन देशहितासाठी आणि पर्यावरण संवर्धनासाठी आपले योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## वात्रटिका

### बदलून गेले जग

कधीच वाटले नाही आणि
पाहिले नाही ते पहावे लागेल...
तसेच कधीच कल्पिले नाही
ते आता सोसावे लागेल...
पुराणातला श्रावणबाळही
खोटा खोटा वाटू लागला...
जपला, मोठा केलेला बाळ
आईबापाचा गळा घोटू लागला...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# मोहोळला चार कोटींची भेट; सांस्कृतिक सभागृहाला मंजुरी



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ शहरातील बहुप्रतीक्षित सांस्कृतिक सभागृह उभारणीच्या मागणीला अखेर यश आले असून शासनाकडून या प्रकल्पासाठी सुमारे चार कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या मागणीमुळे शहरातील कलाकार, सांस्कृतिक क्षेत्रातील मंडळी आणि नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या सांस्कृतिक सभागृहासाठी मोहोळ तालुक्याचे आमदार राजू खरे यांनी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करत हा विषय प्रभावीपणे मांडला. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाल्याने शहरातील विविध स्तरांतील नागरिकांनी त्यांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली.

मोहोळ शहरात सांस्कृतिक सभागृह व्हावे यासाठी अनेक वर्षे सातत्याने प्रयत्न करणारे कलाकार प्रतिनिधी अमोल महामुनी यांनी विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींशी संपर्क साधत मागणी लावून धरली होती. मात्र, त्या काळात संबंधित पदाधिकाऱ्यांकडून अपेक्षित सकारात्मक प्रतिसाद मिळाला नव्हता. अखेर आमदार राजू खरे यांनी या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेत शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केल्याने कलाकारांच्या दीर्घ प्रतीक्षेला न्याय मिळाला आहे.

याप्रसंगी माजी सरपंच अशोक देशमुख, सिनेअभिनेते अमोल महामुनी, ग्रामपंचायत माजी सदस्य दिनेश घागरे, दिलीप गायकवाड, ॲड. विनोद कांबळे, सरफराज सय्यद तसेच कलाकार राजन घाडगे यांनी आमदार राजू खरे यांचा सत्कार केला.

यावेळी उपस्थितांनी हे सभागृह मोहोळ शहराच्या सांस्कृतिक वैभवात मोठी भर घालणारे ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. सत्काराला उत्तर देताना आ.राजू खरे म्हणाले, "मोहोळच्या सांस्कृतिक चळवळीला सक्षम व्यासपीठ मिळावे हीच आमची भूमिका आहे. या सभागृहासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही. सोलापूर जिल्ह्यातील सर्वाधिक उच्च प्रतीचे, दर्जेदार आणि देखणे सांस्कृतिक सभागृह मोहोळमध्ये उभारले जाईल."

# सर्व्हरच्या 'खो'मुळे अकरावी प्रवेश प्रक्रियेचा खेळखंडोबा; विद्यार्थी-पालक त्रस्त

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दहावीचा निकाल यंदा लवकर जाहीर झाल्याने अकरावी प्रवेश प्रक्रिया सुरळीत आणि वेगाने पार पडेल, अशी अपेक्षा विद्यार्थी आणि पालकांनी व्यक्त केली होती. मात्र, ऑनलाइन प्रणालीतील तांत्रिक बिघाडामुळे प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्याच दोन दिवसांत विद्यार्थ्यांचा उत्साह मावळल्याचे चित्र दिसून आले. शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावर दिवसभर 'अंडर मेंटेनन्स'चा संदेश झळकत राहिल्याने विद्यार्थ्यांना फॉर्म भरताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला.

अकरावी प्रवेशासाठी नवीन विद्यार्थ्यांची नोंदणी, भाग-१ फॉर्ममधील बदल तसेच कनिष्ठ महाविद्यालयांचा पसंतीक्रम भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. सकाळपासूनच विद्यार्थी आणि पालकांनी ऑनलाइन प्रक्रियेला सुरुवात केली. मात्र, महाविद्यालय निवडीच्या टप्प्यावर वेबसाइट अचानक संथ झाली आणि काही वेळातच संपूर्ण प्रणाली ठप्प पडली. त्यानंतर स्क्रीनवर 'अंडर मेंटेनन्स'चा संदेश दिसू लागल्याने विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले.

दिवसभर सर्व्हर सुरळीत न झाल्याने अनेक पालक आणि विद्यार्थ्यांनी संताप व्यक्त केला. घरच्या संगणकावर किंवा मोबाइलवर प्रक्रिया पूर्ण होत नसल्याने अनेकांनी रात्री उशिरा महा-ई-सेवा केंद्रे आणि सायबर कॅफेकडे धाव घेतली. शहरातील अनेक केंद्रांवर मध्यरात्रीपर्यंत विद्यार्थ्यांच्या रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले. सर्व्हरवरील ताण कमी झाल्यानंतर उशिरापर्यंत जागून पालकांनी फॉर्म भरून घेतले.

"दहावीचा निकाल लवकर जाहीर करून शिक्षण विभागाने चांगले काम केले. मात्र, ऑनलाइन यंत्रणा सक्षम नसेल तर विद्यार्थ्यांची अशी फरफट कशाला?" असा संतप्त सवाल पालकांतून उपस्थित केला जात आहे. दिवसभर प्रयत्न करूनही फॉर्म भरता आला नाही आणि शेवटी रात्री सायबर कॅफेत जाऊन प्रक्रिया पूर्ण करावी लागली, अशा प्रतिक्रिया विद्यार्थी आणि पालकांनी व्यक्त केल्या.

दरम्यान, निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणींची दखल घेत शिक्षण विभागाने महाविद्यालय पसंतीक्रम भरण्यासाठी मुदतवाढ जाहीर केली आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

### कार्यालयाचे नाव : उपजिल्हाधिकारी (भुसंपादन) क्र. १, सोलापूर

कार्यालयाचा पत्ता : जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर

दुरध्वनी क्र.२०१७/२७३१०२०/२७३१०२१/२७३१०२२ Email ID- slao1solapur@solapur.gmail.com

जा.क्र- २०२६/उभुसं/क्र.१/अभि/आरआर/२९९/२६ **खरेदीपूर्व जाहीर नोटीस** दिनांक- २५/०५/२०२६

सोलापूर जिल्हयातील तमाम लोकांना या जाहिर नोटीसद्वारे कळिवण्यात येते की, कार्यकारी अभियंता (स्था) अऊदा स्था.बा.नि.सु.विभाग, सोलापूर यांच्यामार्फत २२० / १३२/३३ के. व्ही. वटवटे ता. मोहोळ जि. सोलापूर उपकेंद्रासाठी मौजे महाराष्ट्र शासन महसुल व येणकी ता.मोहोळ जि.सोलापूर येथील वन विभागाकडील निर्णय क्र.संकिर्ण/०३/२०१५/प्र.क्र. ३४/अ-२ दि. १२/०५/२०१५, क्र. संकिर्ण/०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२ दि. ३०/०९/२०१५ व परिपत्रक क्र.एलक्युएन/१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२ दि. २५/०१/२०१७ मध्ये जमीन खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी घेणेबाबत विषद केलेल्या कार्यपध्दतीनुसार सार्वजनिक प्रयोजनासाठी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी घेणे प्रस्तावित आहे.

खालील अनूसुचीमध्ये सबंधित जमीन मालकाचे नांव, गट नंबरचे संपादन क्षेत्र इत्यादी तपशिल दिला आहे. सदर जमिनीबाबत जमीन मालकाच्या हिश्यावर हक्क, हितसंबंध, दत्तकपुत्र, वारसाहक्क, गहाण, दान, बोजा, लिज, कर्ज, बक्षिसपत्र, जप्ती, करार, मदार व इतर हक्क असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून सात दिवसाचे आत समक्ष अथवा रजिष्टर्ड पोस्टाने कार्यालयीन वेळेत (सकाळी १०.३० ते सायं. ५.४५ वाजेपर्यंत) पोहचेल अशा रितीने उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र. १, सोलापूर या कार्यालयाकडे लेखी म्हणणे / हरकत सादर करावी. अन्यथा खालील अनुसुचीत स्तंभ ३ मध्ये नमुद जमीन स्तंभ २ मध्ये नमूद जमीन मालकाची निर्वेध व निजोखमी मिळकत असल्याचे समजण्यात येईल. दिलेल्या मुदतीनंतर कोणतीही हरकत असल्यास ती या कार्यालयास कायदेशिररीत्या बंधनकारक राहणार नाही.

**अनुसूची**

**संपादन संस्थेचे नाव : कार्यकारी अभियंता (स्था) अऊदा स्था.बां.नि.सु. विभाग, सोलापूर.**

**संपादनाचे प्रयोजन : २२०/१३२/३३ के. व्ही. वटवटे ता. मोहोळ जि. सोलापूर उपकेंद्रासाठी भूसंपादन प्रस्ताव खाजगी वाटाघाटीद्वारे भूसंपादन करणेबाबत.**

| अ.क्र. | भूधारकांचे नांव- | गट नंबर/ सर्व्हे नंबर | खरेदी करावयाच्या जमीनीचा प्रकार | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे आर) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री. सचिन बिराप्पा जाधव | ८५/१/अ | जिरायत | ०.४० |
| २ | श्री. सचिन बिराप्पा जाधव | ८५/१/ब | जिरायत | ०.४० |
| ३ | श्री. सचिन बिराप्पा जाधव | ८५/१/क | जिरायत | ०.७९ |
| ४ | श्री. सचिन बिराप्पा जाधव | ८५/१/ड | जिरायत | ०.४० |
| ५ | श्री. सचिन बिराप्पा जाधव | ८५/१/इ | जिरायत | ०.४० |
| ६ | श्री. सचिन बिराप्पा जाधव | ८५/२/ब | बिनशेती वाणिज्य प्रयोजन | १.२० |
| ७ | श्री. राहुल बिराप्पा जाधव | ८५/२/अ/१ | जिरायत | १.३९ |
| ८ | प्रियांका राहुल जाधव | ८६/२/ब | बिनशेती वाणिज्य प्रयोजन | १.२५ |
| ९ | प्रियांका राहुल जाधव | ८६/२/अ | बिनशेती वाणिज्य प्रयोजन | ०.७७ |
| | | **एकूण:-** | | **७.००** |

**सही/-**
**(अनुप बा. धांडोरे)**
**अतिरिक्त कार्यकारी अभियंता (स्था)**
**अऊदा स्था.बां.नि.सु.उप वि.क्र.२ सोलापूर**

**सही/-**
**(नवनाथ तु. चव्हाण)**
**कार्यकारी अभियंता (स्था)**
**अऊदा स्था.बां.नि.सु.विभाग, सोलापूर**

स्थळ:- सोलापूर
दिनांक: २५/०५/२०२६

**सही/-**
**(अमोलसिंह भोसले)**
**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र.१)**
**जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर**

जिमाका/सो/जाहि/३४/२०२६-२७

# ज्ञानभारतम प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला प्रारंभ



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** भारताला प्राचीन हस्तलिखितांचा समृद्ध वारसा लाभलेला असून पारंपारिक ज्ञान पिढ्यान पिढ्या हस्तलिखितांच्या माध्यमातून जतन होत आले आहे. मात्र ही मौल्यवान हस्तलिखिते विविध ठिकाणी विखुरलेल्या स्वरूपात असल्याने त्यांचे जतन, संवर्धन व एकत्रित दस्तऐवजीकरण करण्याच्या उद्देशाने भारत सरकारने 'ज्ञानभारतम' (Gyan Bharatam) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची आखणी केली आहे.

भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पांतर्गत देशव्यापी राष्ट्रीय हस्तलिखित सर्वेक्षण मोहिमेला दिनांक १६ मार्च २०२६ पासून प्रारंभ करण्यात आला आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश देशातील मौल्यवान हस्तलिखित वारशाचे सर्वेक्षण, दस्तऐवजीकरण, संवर्धन, डिजिटायझेशन व प्रसार करणे हा आहे.

केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत देशभरातील शैक्षणिक संस्था, संग्रहालये, ग्रंथालये, धार्मिक संस्था तसेच खाजगी संग्राहक यांच्या सहकार्याने एक कोटीहून अधिक हस्तलिखितांचा शोध व नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच भारताच्या समृद्ध ज्ञानपरंपरेशी संबंधित हस्तलिखितांचा राष्ट्रीय डिजिटल संग्रह (National Digital Repository) निर्माण करून तो राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध करून देण्याचा केंद्र शासनाचा मानस आहे.

हस्तलिखितांची मालकी संबंधित संस्था, ग्रंथालय अथवा खाजगी संग्राहक यांच्याकडेच कायम राहणार असून, इच्छुकांनी स्वखुशीने हस्तलिखिते शासनाकडे सुपूर्द केल्यास शासन ती स्वीकारणार आहे.

या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य सरकारांची महत्त्वपूर्ण भूमिका असून विविध सांस्कृतिक संस्था, विद्यापीठे, संशोधन संस्था, हस्तलिखित संग्रहालये तसेच विद्वान यांच्या सहकार्याने ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्यात या प्रकल्पासाठी खालील संस्था क्लस्टर केंद्र व स्वतंत्र केंद्र म्हणून कार्यरत राहणार आहेत :

कवी कालिदास संस्कृत विद्यापीठ, नागपूर - क्लस्टर केंद्र, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे - क्लस्टर केंद्र, आनंद आश्रम संस्थान, पुणे - स्वतंत्र केंद्र, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे - स्वतंत्र केंद्र

महाराष्ट्र राज्यासाठी राज्य नोडल संस्था म्हणून पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य नोडल अधिकारी म्हणून श्री. सुजितकुमार उगले, संचालक, पुराभिलेख संचालनालय कार्य पाहणार आहेत. तसेच श्रीमती अंजली ढमाळ, उपसंचालक, मराठी भाषा विकास संस्था तथा अभिजात मराठी भाषा कक्षा, मराठी भाषा विभाग या सहनोडल अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत.

सदर सर्वेक्षणासाठी "Gyan Bharatam" हे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले असून त्याद्वारे हस्तलिखितांचे क्षेत्रीय मूल्यांकन, पडताळणी व दस्तऐवजीकरणाची प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे.

या मोहिमेच्या अनुषंगाने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना त्यांच्या जिल्ह्यात ज्ञानभारतम प्रकल्पासाठी जिल्हा नोडल अधिकारी नियुक्त करणे, जिल्हास्तरीय समिती स्थापन करणे तसेच मंदिरे, मठ, धार्मिक संस्था, विद्यापीठे, ग्रंथालये, शैक्षणिक संस्था व खाजगी संग्राहक यांना सर्वेक्षणात सहभागी करून घेण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

या सर्वेक्षण मोहिमेत शैक्षणिक संस्था, ग्रंथालये, संग्रहालये, संस्कृत पाठशाळा, धार्मिक संस्था, संशोधक, पारंपरिक पंडित, NCC व NSS स्वयंसेवक, विद्यार्थी तसेच वारसा संवर्धन संस्था यांचा सक्रिय सहभाग अपेक्षित आहे.

आपल्याकडे प्राचीन हस्तलिखिते उपलब्ध असल्यास त्याची माहिती 'Gyan Bharatam' मोबाईल ॲपवर अपलोड करून या राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा नोडल अधिकारी, ज्ञानभारतम प्रकल्प सोलापूर यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.

# खंडित वीजपुरवठ्यामुळे बार्शीतील उद्योग अडचणीत



**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** एकीकडे बार्शी एमआयडीसी परिसरात नवीन उद्योग यावेत, रोजगारनिर्मिती वाढावी यासाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासन प्रयत्नशील असताना दुसरीकडे अस्तित्वात असलेल्या उद्योगांनाच महावितरणच्या ढिसाळ कारभारामुळे विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. सातत्याने खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे संतप्त झालेल्या एमआयडीसी गाताची वाडी परिसरातील प्लास्टिक उद्योग चालकांनी शुक्रवारी आपल्या कामगारांसह थेट महावितरण कार्यालय गाठत तीव्र नाराजी व्यक्त केली.

गेल्या सहा महिन्यांपासून संबंधित उद्योग परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने उत्पादन प्रक्रियेवर मोठा परिणाम होत असल्याचा आरोप उद्योग चालकांनी केला आहे. उत्पादन सुरू असताना अचानक वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे मशीनरी बंद पडते, उत्पादन प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात तसेच कच्च्या मालाचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याची व्यथा त्यांनी मांडली.

यावेळी महिला कामगारांनीदेखील आपल्या अडचणी मांडल्या. वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे अनेकदा काम बंद ठेवावे लागते. काहीवेळा संपूर्ण दिवस कामकाज विस्कळीत होते, तर वेळेअभावी कामगारांना रिकाम्या हाताने घरी परतावे लागते. त्यामुळे कामगारांच्या दैनंदिन उत्पन्नावर आणि कुटुंबाच्या आर्थिक नियोजनावरही परिणाम होत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा करूनही परिस्थितीत सुधारणा होत नसल्याने उद्योजकांचा संयम सुटू लागला आहे. यावेळी कामगार प्रतिनिधी राज ढोले आणि गजानन पवार यांनी समस्या तातडीने सोडविण्याची मागणी केली. त्यांनी कार्यकारी अभियंता राकेश मगर यांना निवेदन देत वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली.

"उद्योग टिकले तरच रोजगार टिकतील. अशा परिस्थितीत मूलभूत सुविधा सुरळीत राहणे गरजेचे आहे. यापुढे लोकप्रतिनिधींसमोरही हे गाऱ्हाणे मांडणार," असा इशारा उद्योजकांनी दिला. त्यामुळे आता महावितरण प्रशासन यावर किती तत्परतेने कार्यवाही करते, याकडे उद्योजक आणि कामगारांचे लक्ष लागले आहे.


## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अ‍ॅडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.


### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) नवी मुंबईतील राष्ट्रवादीतून भाजपवासी झालेले एक नेते २) विजेत्यास दिले जाणारे सन्मानचिन्ह, मेडल ३) पर्वा, चिंता ४) अवजड, बोजड ५) श्रीकृष्णाची माता ६) सश उलट लिहा ७) संजय दत्त अभिनीत एक चित्रपट, व्हिलन ११) गोमाता १२) बनावट, डुप्लीकेट १४) अंधार १५) संपत्ती, इस्टेट (हिंदीत) १६) जिंकणे, पराजयच्या विरूध्दार्थी १८) पुष्कळ, भरपूर १९) व्यक्ती २०) बॉडीगार्ड, किक चित्रपटाचा नायक २२) बारीकसारीक २४) महिना, माह २५) गरीबांचा फ्रिज, डेरा २७) एक उद्योगपती-*** टाटा २९) मनातील इच्छापूर्तीसाठी देवाला घातलेले साकडे ३०) पानाच्या विड्यात हा वापरतात ३१) ढग ३३) किमती वस्तू, ऐवज ३५) बेसन पीठ या द्विदल कडधान्यापासून बनते ३६) नवरा ३७) रूग्णालय ३८) दिवाळीत बनवितात ती तिखट व गोलाकार *** ३९) एक वनस्पतीजन्य तेल-**तेल ४०) तरचा साथीदार ४२) उमर (मराठीत) ४३) कोल्हापूरचे असलेले एक माजी मंत्री-विनय ** ४४) एक पेय, टी (मराठीत) ४५) एक हिंदी न्यूज चॅनल-आज **

**आडवे शब्द :** १) विधानसभेत पन्नास वर्षांहून जास्त काळ प्रतिनिधीत्व केलेले शेकापचे सांगोल्याचे दिवंगत आमदार ८) एक श्वसनरोग ९) एक तेल बी १०) आमीर खान अभिनीत एक चित्रपट १३) फलंदाजाने पूर्ण केलेल्या शंभर धावा १५) सीता १६) श्रीगणेशाचे एक नाव १७) नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे यांची सामाजिक कार्य करणारी संस्था १८) तोटाच्या विरूध्दार्थी १९) सिंघम चित्रपटाचा नायक-*** देवगण २०) सैन्यातील प्रमुख शिलेदार २१) समाजवादी पार्टीचे निवडणूक चिन्ह २३) आश्चर्य, किमानच्या विरूध्दार्थी २५) मामाची बायको २६) फुलांची मोठी माळ, जीतच्या विरूध्दार्थी २८) कमी जास्त नसलेले, एकसारखे ३०) नदीचा तीर ३१) कष्ट, परिश्रम ३२) बुलढाणा लोकसभा मतदारसंघाच्या खासदार- **** राणा कौर ३३) एक मराठी महिना ३४) सूर्य, मुलगा (इंग्रजीत) ३५) निश्चित, खात्रीशीर ३६) क्षण (हिंदीत) ३७) पाच दुणे ३८) गव्हाच्या पिठापासून बनविलेली गोलाकार ४०) लष्करातील सैनिक ४१) उत्पत्ती, वभ उलट लिहा ४३) याचे सरबत बनवितात ४४) हाताने सूत कातण्याचे पूर्वी वापरले जाणारे चक्राकार साधन ४६) सोनिया गांधी यांचा मतदारसंघ ४७) तीन दुणे ४८) समीर भुजबळ या जिल्ह्यातील आहेत

## सुडोकु - 259

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 3 | | 9 | 5 | | | | |
| 2 | | | 6 | 7 | | 5 | 8 | |
| | | 5 | | 1 | | 4 | | |
| 1 | 9 | | | 6 | 3 | 2 | | 5 |
| | 4 | | | | | 6 | | |
| 5 | 6 | 8 | 2 | | 7 | | | |
| | 2 | | | 8 | 1 | 3 | | |
| | | 1 | | | 9 | 7 | 6 | |
| | 7 | | 5 | 2 | | 8 | | 9 |

# अतिक्रमण करून सर्वसामान्यांना त्रास देणाऱ्यांवर कारवाई करा - पालकमंत्री जयकुमार गोरे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरकरांच्या जागांवर अतिक्रमण करून सर्वसामान्य नागरिकांना त्रास देणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच जनतेच्या सेवेत कुचराई करणाऱ्या अधिकाऱ्यांनाही सोडले जाणार नाही, असा इशारा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिला.

संभाजी आरमारच्या १८ व्या वर्धापनदिनानिमित्त बोरोनोको प्रशाला मैदान येथे आयोजित करण्यात आलेल्या वज्रमूठ मेळाव्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी पालकमंत्री गोरे यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज यांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी, देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल तसेच भाजप जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण



यांची प्रमुख उपस्थिती होती.

पालकमंत्री गोरे यांनी संभाजी आरमारच्या गेल्या १८ वर्षांतील सामाजिक कार्याचे कौतुक करत सोलापूरकरांच्या विविध प्रश्नांवर शासन स्तरावर आवश्यक ती कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिले. सामान्य नागरिकांच्या हक्कांवर गदा आणणाऱ्यांना सोडले जाणार नाही, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांनी आपल्या भाषणात आदिला नदी–नाला प्रश्नामुळे बाधित झालेल्या मिळकतधारकांचे प्रश्न, सर्वसामान्यांच्या जागांवरील अतिक्रमणे, दिव्यांग बांधवांसाठीच्या महापालिका निधीचा प्रश्न तसेच रिक्षाचालक कल्याणकारी मंडळाच्या प्रभावी अंमलबजावणीसंदर्भात ठोस भूमिका मांडली.

या मेळाव्यात सोलापूर शहर आणि जिल्ह्याचा लौकिक वाढविणाऱ्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा गौरव करण्यात आला. यामध्ये जनमेजयराजे भोसले, गारमेंट उद्योजक, सोलापूर जिल्हा यंत्रमाग संघ, खाटीक समाज तसेच अजनाळे ग्रामस्थांचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी संतोष साळुंखे यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या तेजस्वी जीवनावर आधारित शाहिरी जलसा सादर करत उपस्थितांमध्ये उत्साह निर्माण केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्याध्यक्ष नगरसेवक शिवाजी वाघमोडे यांनी केले.

कार्यक्रमास माजी उपमहापौर पद्माकर (नाना) काळे, सामाजिक कार्यकर्ते राजाभाऊ आलुरे, सरचिटणीस गजानन जमदाडे, उपाध्यक्ष शशिकांत शिंदे, शहरप्रमुख सागर ढगे, संघटक राज जगताप यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अधिक मासानिमित्त व्हीआयपी दर्शन पूर्णपणे बंद : कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** अधिक मासानिमित्त चंद्रभागा स्नान व श्री विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेण्यासाठी भाविक लाखोंच्या संख्येने पंढरीत येत आहेत. भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता दर्शन रांग व मंदिर परिसरात शेडनेट उभारुन सावली तयार करण्यात आली आहे. तर दर्शन रांगही वॉटरप्रूफ बनविण्यात आली आहे. यामुळे दर्शन रांगेत तासनतास थांबून भाविक दर्शन घेत आहेत. भाविकांना सुलभ, जलद व शांततेत दर्शन मिळावे म्हणून जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी मंदिर प्रशासनाला सुचना दिल्या आहेत. त्यानुसार व्हीआयपी दर्शन पूर्णपणे बंद करण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

अधिक मासानिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूर येथे राज्यासह देशभरातून मोठ्या प्रमाणात भाविक दाखल होत आहेत. दि.17 मे ते 15 जून या कालावधीत श्री विठ्ठल–रुक्मिणी दर्शनासाठी दर्शन रांगेमध्ये मोठी गर्दी होत आहे. भाविकांना सुलभ, जलद व शांततेत दर्शन मिळावे यासाठी प्रशासनाने विविध उपाययोजना राबविल्या आहेत. उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी पंढरपूर विभाग पंढरपूर यांनी शासन निर्णय व मार्गदर्शक सूचनांनुसार दर्शन रांगांचे नियोजन काटेकोरपणे करण्याचे निर्देश पोलीस प्रशासन व मंदिर प्रशासनास दिले आहेत. कोणत्याही भाविकास अन्य मार्गाने किंवा नियमबाह्य पद्धतीने दर्शन देऊ नये, असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. याच पार्श्वभूमीवर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 (2) अन्वये दर्शन रांगांमध्ये घुसखोरी करणाऱ्या व्यक्तींवर प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. काही इसमांकडून दर्शन रांगांमध्ये घुसखोरी करून गोंधळ निर्माण होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था



अबाधित राखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच व्हिआयपी दर्शनामूळे दर्शन रांगेतील भाविकांना वेळ लागत असल्याने तेही बंद करण्यात आले आहे.

दर्शन रांगांमध्ये घुसखोरी करणारे, नियमांचे उल्लंघन करणारे अथवा भाविकांना त्रास देणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता व इतर संबंधित कायद्यांनुसार गुन्हे दाखल करण्यात येतील. श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिर समिती, पोलीस प्रशासन व महसूल प्रशासन यांच्या समन्वयातून भाविकांना सुरक्षित, शिस्तबद्ध व सुलभ दर्शन मिळण्यासाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे.

**दर्शनाची वेळ पाहूनच रांगेत उभे रहावे**

आषाढी व कार्तिकी यात्रेप्रमाणे अधिक मास कालावधीत श्री विठ्ठल–रुक्मिणी मातेचे दर्शन 24 तास उपलब्ध नसते. अधिक मास कालावधीत दररोज सकाळी 6.00 ते रात्री 12.00 वाजेपर्यंत दर्शन व्यवस्था उपलब्ध करण्यात आलेली आहे. तसेच दर्शन रांगेचे प्रवेशद्वार रात्री 10.00 वाजता बंद करण्यात येत आहे. रात्री 12.00 ते पहाटे 4.00 या कालावधीत श्रींची विश्रांती असते.

तसेच पहाटे 4.00 ते 5.00 या वेळेत काकड आरती व नित्य पूजा होत असल्यामुळे या कालावधीत दर्शन बंद राहते.तथापि, दर्शन बंद झाल्यानंतरही अनेक भाविक दर्शन रांगेत उभे राहत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे भाविकांची गैरसोय होत आहे. पहाटे 5.00 वाजता पुन्हा दर्शनास सुरुवात होत असल्याने सर्व भाविकांनी दर्शनाच्या वेळेची माहिती घेऊनच दर्शन रांगेत प्रवेश करावा, असे आवाहन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी केले आहे.

# आषाढी वारी 2026 यशस्वी होण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी समन्वय ठेवून कामे करावीत:- जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन

**सोलापूर (कटुसत्य वृत्त):-** यावर्षी आषाढी एकादशी यात्रा दिनांक 25 जुलै 2026 रोजी पार पडणार असून ती शांततेत व नियोजनबद्ध पद्धतीने यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी परस्परात योग्य समन्वय ठेवून कामे करावीत. तसेच सर्व पालखी मार्ग व पंढरपूर शहरात वारकरी भाविकांना प्रशासनाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आलेल्या सोयीसुविधामुळे त्यांचे समाधान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी केले.

नियोजन भवन येथे आषाढी वारी 2026 नियोजनाबाबत आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन मार्गदर्शन करत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, पंढरपूर उप विभागीय अधिकारी सचिन इथापे, पंढरपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, सार्वजनिक बांधकाम विभागाने अधीक्षक अभियंता श्याम कुंभार, महावितरणचे अधीक्षक अभियंता सुनील माने यांच्या सह सर्व संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्तिकेयन पुढे म्हणाले की, आषाढी वारी 2026 मध्ये पालखी मार्गावर तसेच विसावा व मुक्कामाच्या ठिकाणी सुविधा निर्माण करण्यासाठी टेंडर प्रक्रिया राबवायची आहे अशा विभागांनी कामांची यादी 23 मे 2026 अखेरपर्यंत प्रशासनाला सादर करावी. त्यानंतर प्रशासनाच्या वतीने विधान परिषद निवडणूक आचारसंहितेच्या अनुषंगाने आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर या कामांना सवलत देण्याबाबत मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात येणार



असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच जिल्हा परिषद, पंढरपूर नगरपरिषद अन्य नगरपरिषद व विभागांना वारी कालावधीत विविध कामे करण्यासाठी निधी मागणीचे प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे शनिवारी सायंकाळपर्यंत प्राप्त झाले पाहिजेत. त्यानंतर त्या प्रस्तावावर पालकमंत्री महोदय यांची मान्यता घेऊन निधी मंजुरीची कार्यवाही करणे शक्य होणार आहे. त्याप्रमाणेच सर्व विभागांनी त्यांना कोणत्याही प्रकारची अडचण असेल तर त्वरित आपल्याशी, पोलीस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. आषाढी वारी ही कुंभ मेळाव्यानंतर सर्वात मोठी यात्रा आहे. तसेच प्रत्येक वारी नाविन्यपूर्ण असते त्यामुळे प्रत्येक यंत्रणांनी त्यांच्यावर असलेली जबाबदारीचे काटेकोरपणे नियोजन करावे असेही जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी सुचित केले.

एसटी महामंडळाने यावर्षीच्या वारीसाठी राज्यभरातून 5400 बसेस ची व्यवस्था केलेली आहे तरी महामंडळाने त्यांच्या सर्व बसेसची तपासणी करून घ्यावी. त्या रस्त्यामध्ये कुठेही बंद पडणार नाहीत याची खात्री करावी. नेहमीप्रमाणे पंढरपूर शहरात तात्पुरते बस स्थानक उभारून त्या ठिकाणी मोबाईल टॉयलेटची व्यवस्था करावी व ते स्वच्छ राहील या दृष्टीने काटेकोरपणे नियोजन करावे अशा सूचना जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिल्या.

अन्न व औषध विभागाने पंढरपूर शहर येथील सर्व हॉटेल्स किराणा दुकाने व अन्नपदार्थाची तपासणीसाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करावे. कोणत्याही प्रकारचा अन्नपदार्थातून अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता घ्यावी. तर पाटबंधारे विभागाने भीमा नदीपत्रात वारी कालावधीत आवश्यक पाणी सोडावे. भीमा नदीपत्रातील होड्यांच्या दृष्टीने योग्य ती दक्षता घ्यावी असेही त्यांनी म्हटले.

मंदिर समितीने तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील राहिलेली कामे त्वरित पूर्ण करून घ्यावीत. तसेच वारी कालावधीत पत्रा शेड तसेच भाविकांना आवश्यक सर्व सोयी सुविधा व्यवस्थित राहतील याची दक्षता घ्यावी. यावर्षीही वारी कालावधीत व्हीआयपी दर्शन बंद राहील असेही जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी सांगितले. वारकरी भाविकांना दर्शन घेण्यात कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही या दृष्टीने प्रयत्न करावेत.

संपूर्ण पालखी मार्ग, पालखीचे विसावा ठिकाणी, मुक्कामाचे ठिकाणी, पंढरपूर शहरात भक्ती सागर पत्रा शेड या ठिकाणी मोबाईल टॉयलेटची व्यवस्था चांगली करावी. त्यावर स्वच्छतेसाठी पुरेशी मनुष्यबळ उपलब्ध करावे व पाण्याच्या टँकरची व्यवस्था करावी. तसेच ज्या ठिकाणी कायमस्वरूपी शौचालय आहेत त्या शौचालयांची संपूर्ण दुरुस्ती करून घ्यावी. इथे येणाऱ्या भाविकांना वारकऱ्यांना शौचालयाची चांगली व्यवस्था राहील या दृष्टीने सर्व संबंधितांनी प्रयत्न करावेत असे निर्देश जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले.

पालखी मार्गावरील अंगणवाडी शाळा प्राथमिक आरोग्य केंद्र त्यांच्या दुरुस्तीची आवश्यकता असेल तर निधी मागणीचे प्रस्ताव तात्काळ सादर करावेत. पोलीस विभागाने त्यांना आवश्यक असलेल्या 700 बँकेतील चा प्रस्ताव द्यावा. जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने वारी कालावधीसाठी आवश्यक औषधी खरेदी वेळेत करावी. जिल्हा शल्य चिकित्सक यांनी आरोग्य पथके तयार करावीत मोबाईल आरोग्य पथकेही तयार करावेत. पालखी विसावा ठिकाण व मुक्कामाच्या ठिकाणी पालखी गेल्यानंतर तात्काळ त्या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवावी, अशा सूचना जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी केल्या.

जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पालखी महामार्गावर ग्रामीण भागात पालखी व भाविकांना सोयी सुविधा देण्यासाठी 61 कोटीच्या निधीचा आराखडा तयार केलेला आहे. या अंतर्गत दहा हजार मोबाईल टॉयलेट, पालखी मुक्कामाच्या ठिकाणी तसेच अन्य 22 ठिकाणी जर्मन हँगर मंडप उभारला जाणार आहे. यातून वारकऱ्यांना आरोग्य सुविधा, चार्जिंग स्टेशन, पाणीपुरवठा, पालखी मुक्कामाच्या ठिकाणी मुरमीकरण रस्ते आदी कामे प्रस्तावित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी माळशिरस उपविभागीय अधिकारी विजया पांगरकर यांनी पालखी मार्गावर केलेल्या व आवश्यक असलेल्या सुविधांची माहिती दिली.

पंढरपूर नगर परिषदेचे मुख्य अधिकारी महेश रोकडे यांनी नगर परिषदेच्या वतीने पंढरपूर शहरात भाविकांसाठी नियोजित असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. यामध्ये भक्ती सागर येथे एक हजार ऐंशी कायमस्वरूपी टॉयलेट उभारलेले आहेत व वाखरी पालखी तळावर दोन हजार मोबाईल टॉयलेट उपलब्ध केले जाणार आहेत. तर दोनशे सफाई कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तर मंदिर समितीच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी भाविकांसाठी देण्यात येणार असलेल्या आरोग्य सुविधा, पाणी जेवण सुरक्षा यंत्रणा या अनुषंगाने सविस्तर माहिती दिली.

# बापूसाहेब आडसूळ यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षकभूषण पुरस्कार प्रदान



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य नाभिक महामंडळाच्यावतीने आयोजित कार्यक्रमात एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेनेचे प्रदेशाध्यक्ष प्रा. डॉ. बापूसाहेब आडसूळ यांना राज्यस्तरीय 'आदर्श शिक्षक भूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य नाभिक महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष कल्याण दळे, खासदार प्रणिती शिंदे यांच्याहस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे संयोजक वैभव शेटे यांच्यासह विविध मान्यवर, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्यानिमित्ताने महाराष्ट्र नाभिक महामंडळाच्यावतीने वधू–वर सूचक मेळावा तसेच सामुदायिक विवाह सोहळ्याचेही आयोजन करण्यात आले होते. समाजातील एकोप्याला आणि सामाजिक बांधिलकीला बळ देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले. प्रा. डॉ. बापूसाहेब आडसूळ यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा सन्मान देण्यात आल्याने विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# वादळी पाऊस आणि विजांच्या कडकडाटाने मोहोळ हादरले

**कुरुल (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील कुरुल, शिंगोली, कातेवाडी, बेगमपूर, मिरी, वटवटे, येणकी, परमेश्वर पिंपरी, कामती, सोहोळे, जामगाव, वाघोली आदी परिसरात शनिवारी मध्यरात्री झालेल्या अवकाळी पावसाने आणि वादळी वाऱ्याने मोठा तडाखा दिला. या अवकाळी संकटामुळे शेतकऱ्यांच्या शेतीपिकांसह फळबागांचे मोठे नुकसान झाले असून नागरिकांनाही मोठा फटका बसला आहे.

शनिवारी दिवसभर परिसरात प्रचंड उष्णता आणि उकाडा जाणवत होता. मात्र रात्री साडेअकराच्या सुमारास अचानक वातावरणात बदल झाला. विजांचा कडकडाट, ढगांचा गडगडाट आणि अर्धा तास सुरू असलेल्या जोरदार वाऱ्यासह पावसाने परिसर अक्षरशः झोडपून काढला. वादळी वाऱ्याच्या तडाख्यामुळे आंबा, चिंच, लिंबू, जांभूळ आदी फळपिके मोठ्या प्रमाणात जमिनीवर गळून पडली. तसेच अनेक ठिकाणी उभ्या ऊसपिकाचे नुकसान होऊन पिके आडवी झाली आहेत.

वादळामुळे वाड्या–वस्त्यांवरील जनावरांच्या निवाऱ्यांवरील पत्रे उडून गेली असून काही घरांचेही नुकसान झाले आहे. शेतात साठवून ठेवलेला कडबा आणि मुरघास भिजल्याने पशुपालकांनाही आर्थिक फटका बसला आहे. अनेक ठिकाणी झाडे उन्मळून



पडल्याने वीजवाहिन्यांचे नुकसान झाले असून रात्री उशिरापर्यंत वीजपुरवठा खंडित होता. उकाडा आणि वीज नसल्यामुळे नागरिकांना रात्रभर जागरण करावे लागले.

दरम्यान, जनहित शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर देशमुख यांनी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत नुकसानग्रस्त भागांचे तातडीने पंचनामे करण्याची मागणी केली. त्यानुसार मोहोळचे तहसीलदार सचिन मुळीक यांना तातडीने पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले असून तालुका कृषी अधिकारी हर्षद निगडे यांनीही नुकसानीची दखल घेण्यास सुरुवात केली आहे.

**नुकसानग्रस्तांना तातडीने मदत द्यावी**

मोहोळ तालुक्यातील विविध गावांमध्ये घरांवरील पत्रे उडून गेल्याने अनेक नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शेतीपिके आडवी झाल्याने शेतकरी अडचणीत आले असून प्रशासनाने तातडीने पंचनामे करून शेतकरी आणि नुकसानग्रस्त नागरिकांना त्वरित मदत द्यावी, अशी मागणी तालुक्यातून जोर धरत आहे.

# वादळी पाऊस व गारपीटीने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले

**कुंभारी (कटूसत्य वृत्त):-** दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी परिसरात शनिवारी सायंकाळी व रात्री झालेल्या वादळी वाऱ्यासह गारपीट आणि जोरदार पावसाने मोठा कहर केला. या अवकाळी संकटामुळे पपई, द्राक्षे, लिंबू तसेच विविध फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करून शासनाने मदत द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.

फळबाग पिके ही खर्चिक आणि दीर्घकालीन स्वरूपाची असतात. वर्षभर मेहनत घेऊन शेतकरी या पिकांची जपणूक करत असतात. तब्बल १२ ते १४ महिन्यांच्या कष्टानंतर उत्पादन हाती येण्याच्या टप्प्यावर असताना अचानक आलेल्या गारपिटीने अनेक शेतकऱ्यांचे स्वप्न उद्ध्वस्त झाले आहे. हातातोंडाशी आलेले पीक वाया गेल्याने शेतकरी चिंतेत असून त्यांच्या समोर मोठे आर्थिक संकट उभे ठाकले आहे.

कुंभारीसह दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोट तालुक्यातील



अनेक भागांमध्येही फळबागांचे मोठे नुकसान झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने पाहणी करून पंचनामे करावेत आणि शासनाकडे मदतीचा प्रस्ताव पाठवावा, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.

फळबाग हे शेतकऱ्यांसाठी केवळ पीक नसून वर्षभराच्या कष्टाचे आणि आशेचे प्रतीक असते. केळी, पपई, द्राक्षे यांसारख्या पिकांसाठी पाणी, औषधे, खते आणि मजुरीवर लाखो रुपये खर्च करावे लागतात. मात्र, एका तासाच्या गारपिटीने सर्व मेहनतीवर पाणी फिरले आहे.

"शासनाने केवळ पाहणी न करता तातडीने मदत जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा," अशी मागणी शेतकरी विपीन करजोळे यांनी केली आहे.

# कामती परिसरात वादळी वाऱ्याचा तडाखा



**पोखरापूर (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ तालुक्यातील कामती जिल्हा परिषद गटातील लांबोटी, कोळेगाव, अर्जुनसोंड, मुंढेवाडी आदी गावांना शनिवारी सायंकाळी झालेल्या वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा मोठा फटका बसला.

या नैसर्गिक आपत्तीत अनेक घरांवरील पत्रे उडून गेली असून गुरांसाठी उभारण्यात आलेले पत्र्याचे शेडही उखडून पडल्याने मोठे नुकसान झाले आहे. घरातील संसारोपयोगी साहित्य, धान्य व इतर वस्तू भिजल्याने नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

शनिवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास परिसरात अचानक वादळी वाऱ्यासह पावसाने जोरदार हजेरी लावली. नागरिक कुटुंबासमवेत घरात जेवण करत असताना अचानक वाऱ्याचा वेग वाढल्याने अनेकांच्या घरांवरील पत्रे उडून गेली.

काही ठिकाणी पत्रे दूरवर जाऊन पडली, तर काही घरांमध्ये पावसाचे पाणी शिरल्याने घरातील साहित्य पूर्णपणे भिजून गेले.

वादळी वाऱ्यामुळे अर्जुनसोंड, मुंढेवाडी, कोळेगाव, लांबोटी परिसरात मोठ्या प्रमाणात हानी झाली आहे. अनेक कुटुंबांना उघड्यावर राहण्याची वेळ आली असून नुकसानग्रस्तांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

नुकसानीची माहिती मिळताच भाजपाचे युवा नेते अक्षय खताळ यांनी तात्काळ प्रभावित गावांना भेट देत नुकसानग्रस्त नागरिकांची विचारपूस केली. तसेच प्रशासनाकडून मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी त्यांनी नुकसानग्रस्त अनेक कुटुंबांच्या जेवणाचीही व्यवस्था केली.

दरम्यान, जिल्हा परिषद सदस्या विमलताई तानाजीराजे खताळ व अक्षय खताळ यांनी महसूल प्रशासनाशी तात्काळ संपर्क साधून झालेल्या नुकसानीचे पंचनामे त्वरित करण्याची मागणी केली आहे.

नुकसानग्रस्तांना तातडीने आर्थिक मदत देण्याचीही मागणी स्थानिकांकडून होत आहे.

# सोलापूरात विशेष सखोल पुनर्रिक्षण (SIR) प्रक्रिया पारदर्शकपणे राबवावी – खा. प्रणिती शिंदे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** संपूर्ण महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात निवडणूक आयोगामार्फत विशेष सखोल पुनर्रिक्षण (SIR) प्रक्रिया सुरू असून मतदार याद्या अद्ययावत करणे, नवीन नावे समाविष्ट करणे, चुकीची नावे दुरुस्त करणे, मृत अथवा स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे तसेच बूथ फेररचना आदी कामे सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी आज जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांची भेट घेऊन SIR प्रक्रियेबाबत सविस्तर चर्चा केली. यावेळी सोलापूर पूर्व जिल्हा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार, शहर काँग्रेस अध्यक्ष चेतनभाऊ नरोटे, सोलापूर पश्चिम जिल्हाध्यक्ष संदीप साठे, पंढरपूर तालुका अध्यक्ष संदीप पाटील, मंगळवेढा तालुका अध्यक्ष प्रशांत साळे, दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष भीमाशंकर जमादार, उत्तर सोलापूर तालुका अध्यक्ष भारत जाधव, माजी नगरसेवक मनोज यलगुलवार, अशोक निंबर्गी, पंढरपूर शहराध्यक्ष आदित्य फत्तेपूरकर, जिल्हा उपाध्यक्ष राजेश पवार, मोहोळ शहराध्यक्ष किशोर पवार, युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, अर्जुन पाटील, रविकिरण



कोळेकर, ब्लॉक अध्यक्ष देवाभाऊ गायकवाड, बाबुराव म्हेत्रे, परशुराम सतारेवाले, तिरुपती परकीपंडला, शिरीष चव्हाण, अब्दुल खलील मुल्ला, संजय बनसोडे, शिवशंकर अंजनाळकर, लक्ष्मीकांत साका, संजय गायकवाड, सुभाष वाघमारे, नागेश म्याकल, विवेक कन्ना आदी उपस्थित होते.

यावेळी खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की, रक्क्र प्रक्रिया ही पूर्णपणे पारदर्शक आणि निष्पक्ष पद्धतीने राबवली गेली पाहिजे. बूथ लेव्हल ऑफिसर (BLO) यांनी सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली काम न करता प्रत्येक मतदाराच्या घरोघरी जाऊन प्रक्रिया राबवावी. या प्रक्रियेत बूथ लेव्हल एजंट (BLA) यांनाही सोबत घेणे आवश्यक असून त्यामुळे मतदार याद्यांबाबत कोणताही संशय राहणार नाही.

त्या पुढे म्हणाल्या की, प्रत्येक मतदाराने एन्युमरेशन फॉर्म काळजीपूर्वक भरून आवश्यक कागदपत्रांसह वेळेत जमा करणे अत्यंत गरजेचे आहे. फॉर्ममध्ये संपूर्ण माहिती, फोटो आणि सही अचूक असणे आवश्यक असून फॉर्म न भरल्यास मतदार यादीतून नाव वगळले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे मतदारांनी सतर्क राहून स्वतःचे नाव मतदार यादीत कायम आहे का याची खात्री करून घ्यावी. खासदार प्रणिती शिंदे यांनी यावेळी गंभीर चिंता व्यक्त करत सांगितले की, काही राज्यांच्या निवडणुकांमध्ये SIR प्रक्रियेच्या माध्यमातून विरोधकांच्या मतदारांची नावे कमी करण्यात आल्याचे आरोप झाले होते. बंगाल आणि बिहार निवडणुकांमध्ये अशा प्रकारच्या तक्रारी समोर आल्या असून सोलापूरमध्येही तसे होऊ नये यासाठी काँग्रेस पक्ष सतर्क आहे. मतदारांची नावे वगळण्याची कोणतीही प्रक्रिया पारदर्शक असावी, कमी करण्यात आलेल्या नावांची यादी उपलब्ध करून द्यावी तसेच BLO यांची नावेही सार्वजनिक करण्यात यावीत, अशी मागणी त्यांनी केली. तसेच मतदारांची नावे कमी करण्याचा प्रयत्न झाल्यास संबंधितांनी तात्काळ संपर्क साधावा, प्रशासनावर पारदर्शक प्रक्रिया राबविण्यासाठी लोकशाही मार्गाने दबाव निर्माण केला जाईल आणि प्रत्येक पात्र मतदाराचे मतदानाचे अधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी काँग्रेस पक्ष कटिबद्ध असल्याचेही खासदार प्रणिती शिंदे यांनी स्पष्ट केले.

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी सांगितले की, कोणत्याही पात्र मतदाराचे नाव अन्यायकारकरीत्या वगळले जाणार नाही याची प्रशासन दक्षता घेईल असे सांगितले.

# 'लवंगी मिरची' कला केंद्रावर धाड 50 लाखांहून अधिक मुद्देमाल जप्त

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** पोलीस अधीक्षक यांच्या आदेशानुसार बार्शी तालुका पोलीस ठाणे हद्दीत अवैध व्यवसायांवर धडक कारवाई मोहीम सुरू असून, त्याअंतर्गत बार्शी–लातूर रोडवरील 'लवंगी मिरची' कला केंद्रावर पोलिसांनी मध्यरात्री धाड टाकून मोठी कारवाई केली आहे.

दि. 24 मे 2026 रोजी रात्री 1.30 वाजण्याच्या सुमारास शासनाने निर्धारित केलेल्या वेळेनंतरही सदर कला केंद्र सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिस पथकाने घटनास्थळी जाऊन छापा टाकला असता, कला केंद्र सुरू असल्याचे निदर्शनास आले.

या कारवाईत नृत्यांगना, ग्राहक, चालक आणि मालक अशा एकूण 72 जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता, महाराष्ट्र पोलीस अधिनियम व महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी घटनास्थळावरून रोख रक्कम, मोबाईल फोन, साहित्य, चारचाकी व दुचाकी वाहने तसेच देशी दारूच्या बाटल्या असा एकूण 50 लाख 13 हजार 460 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास बार्शी तालुका पोलीस ठाणे करीत आहे.

ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक व सहायक पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.